

## मुंबई प्रहार

पुलांमुळे ठाकुर्लीकरांचा जीव टांगणीला...१

कांदळवनांची कत्तल, खाडीत भरणी...२

www.prahaar.in

शुक्रवार, १६ जुलै २०१०

# प्रहार

नोंदणी क्रमांक : एमएएचएमएआर/२००५/१८६८१ ■ मुंबई ■ वर्ष २ ■ अंक २७८ ■ पाने १६ (मुंबई प्रहारसह) ■ दोन रुपये


### प्रहार कौल — प्रश्न आमचा कौल तुमचा...

**आजचा प्रश्न :** राष्ट्रकुल स्पर्धेस मदतीसाठी भारतीय ऑलिंपिक समितीने भारतीय क्रिकेट बोर्डासमोर हात पसरणे योग्य वाटते का?

A होय B नाही C तटस्थ

उत्तर पाठवण्यासाठी PK(space) A/B टाइप करून 5757512 ला एसएमएस करा किंवा आपले उत्तर www.prahaar.in या संकेतस्थळावर नोंदवा.

**कालचा प्रश्न :** वायुगळतीस अप्रत्यक्षपणे कारणीभूत ठरलेल्या मुंबई पोर्ट ट्रस्ट प्रशासनावर कारवाई व्हावी, असे वाटते का?




# फी वाढीला चाप

- शुल्कआकारणी होणार पारदर्शी
- शाळांना संकेतस्थळ बंधनकारक
- एकदा केलेली शुल्कवाढ ३ वर्षे कायम
- शुल्कनियंत्रण मागील वर्षापासून लागू
- नफेखोरीला लगाम घालण्यासाठी विभागीय स्तरावर समित्या स्थापन होणार
- नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शाळांची मान्यता / एनओसी काढण्याची कारवाई

**मुंबई (प्रतिनिधी) :** राज्यातील सर्व प्रकारच्या खासगी शाळांनी आकारावयाचे शुल्क निश्चित करण्याबाबतची नियमावली राज्य सरकारने गुरुवारी शासन आदेश काढून (जीआर) जाहीर केली. यानुसार आता एसएससी बोर्डाच्या विनाअनुदानित शाळांसह अन्य सर्व बोर्डांच्या शाळांनी शैक्षणिक शुल्क आकारणी करताना पूर्ण पारदर्शिता बाळगणे आवश्यक आहे. त्यासाठी शाळांनी शुल्क आकारणीचा संपूर्ण तपशील स्वतःचे स्वतंत्र संकेतस्थळ सुरू करून त्यावर उपलब्ध करून द्यावयाचा आहे. नव्या निकषांनुसार होणारी ही शुल्कवाढ मागील शैक्षणिक वर्षापासून लागू होणार असल्याने गेल्या सहा महिन्यांत दोन वेळा अनिर्बंध शुल्कवाढ करणाऱ्या शाळांच्या मनमानीला चाप बसला आहे. मात्र शाळांनी त्यांची वाजवी शिल्लक (रेव्हेन्यू सरप्लस) किती टक्के ठेवावी याबाबत मौन बाळगून सरकारने शाळांना पळवाट ठेवली आहे. २१ मे २०१०च्या जीआरमध्ये ही टक्केवारी वार्षिक ६ टक्के इतकी मर्यादित केली होती.

वार्षिक शुल्क ठरवण्यासाठी शाळांनी एकूण खर्चाला एकूण विद्यार्थ्यांच्या संख्येने भागून नंतर १२ने भागून मासिक शुल्क ठरवायचे आहे. शुल्कवाढ करण्यापूर्वी सहा महिने अगोदर पालकांना त्याची कल्पना देणे बंधनकारक आहे. शाळा आणि विद्यार्थ्यांच्या विकासासाठी होणाऱ्या प्रस्तावित खर्चास शिक्षक-पालक संघाची मान्यता आवश्यक आहे. शुल्क वाढवताना शाळेने तो प्रस्ताव आधी पालक-शिक्षक संघाच्या कार्यकारी समितीपुढे खर्चाच्या सर्व तपशीलांसह ठेवून त्या समितीची मान्यता मिळवायची आहे. नंतर शिक्षण उपसंचालकांच्या अध्यक्षतेखालील विभागीय समितीने या प्रस्तावाची पडताळणी करून त्यावर एक महिन्याच्या आत अंतिम निर्णय घ्यावयाचा आहे. या निर्णयाविरुद्ध अपील करावयाचे असल्यास ते पुढील महिनाभरात राज्य समितीपुढे करून समितीने ४५ दिवसांच्या आत निर्णय देणे बंधनकारक आहे. विभागीय समितीत शिक्षण उपसंचालक अध्यक्ष तर अन्य पालक प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, अर्थतज्ज्ञ आदी सदस्यांचा समावेश असणार आहे. राज्याचे शिक्षण संचालक राज्य समितीचे पदसिद्ध अध्यक्ष असतील. दोन्ही समित्यांवरील अशासकीय सदस्यांचा (नोंदणीकृत संस्थचे सी.ए., कॉस्ट अॅण्ड वर्क्स अकाउंटंट आदी) कार्यकाळ ३ वर्षांचा असेल. राज्य समितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

### शिलकीबाबत पळवाट धोक्याची

**राज्य सरकारने पालक प्रतिनिधींच्या ८० टक्के मागण्यांना जीआरमध्ये न्याय दिला आहे. मात्र २१ मे २०१०च्या जीआरमध्ये ठेवलेली शाळांच्या वाजवी शिलकीची ६ टक्के इतकी मर्यादा या जीआरमध्ये गुंडाळून ठेवली आहे. शाळांची वाजवी शिल्लक (विकासात्मक कामांसाठी राखीव ठेवली जाणारी रक्कम) शुल्क आकारणीत महत्त्वाची भूमिका बजावत असताना सरकारने ही शिल्लक किती असावी, याबाबत या जीआरमध्ये पूर्ण मौन बाळगल्याने शाळांकडून त्याचा गैरवापर होण्याची शक्यता आहे. मुळात वारंवार जीआर काढण्याऐवजी सुरू असलेल्या अधिवेशनात सरकारने कायदा करून शाळांच्या फीनियंत्रणाचे कायमस्वरूपी धोरण ठरवावे. कारण जीआरला न्यायालयात आव्हान दिल्यास तो रद्द होण्याची शक्यता असते.**

**- जयंत जैन,** बन्सल समिती सदस्य आणि अध्यक्ष, फोरम फॉर फेअरनेस इन एज्युकेशन

## ११वी प्रवेश आजपासून

**मुंबई (प्रतिनिधी) :** अकरावी ऑनलाइन प्रवेशांना शुक्रवारपासून सुरुवात होत असून संपूर्ण प्रक्रियेचे वेळापत्रक शिक्षण विभागाने गुरुवारी जाहीर केले. यानुसार प्रवेशप्रक्रिया पूर्ण होऊन महाविद्यालये सुरू होण्यास सप्टेंबरचा पहिला आठवडा उजाडणार आहे. ऑगस्ट अखेरपर्यंत नियमित आणि त्यानंतर ऑफलाइन पद्धतीने एटीकेटीचे प्रवेश होतील. साधारणपणे जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात सुरू होणारे वर्ग यंदा तब्बल दीड महिना उशिराने सुरू होतील. प्रवेश प्रक्रियेची सर्व माहिती विद्यार्थ्यांना त्यांच्या माहितीपुस्तिकेत तसेच संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**संबंधित बातम्या...११**

### असे होतील प्रवेश

| | |
|---|---|
| ऑनलाइन अर्ज भरून सादर करणे | : १६ ते २६ जुलै |
| बायफोकल (द्विलक्षी) अभ्यासक्रमाची पहिली गुणवत्ता यादी | : ३० जुलै, सायंकाळी ५ वाजता |
| बायफोकलच्या पहिल्या गुणवत्ता यादीचे प्रवेश | : ३१ जुलै ते २ ऑगस्ट, सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत |
| बायफोकल अभ्यासक्रमाची दुसरी गुणवत्ता यादी | : ५ ऑगस्ट सायंकाळी ५ वाजता |
| बायफोकलच्या दुसऱ्या यादीचे प्रवेश | : ६ आणि ७ ऑगस्ट, सकाळी १० ते दुपारी २ |
| कला, वाणिज्य, विज्ञान शाखांची पहिली गुणवत्ता यादी | : ९ ऑगस्ट, सायंकाळी ५ वाजता |
| पहिल्या गुणवत्ता यादीचे प्रवेश | : १० ते १३ ऑगस्ट, सकाळी १० ते दुपारी २ |
| कला, वाणिज्य, विज्ञान शाखांची दुसरी गुणवत्ता यादी | : १९ ऑगस्ट, सायंकाळी ५ वाजता |
| दुसऱ्या गुणवत्ता यादीचे प्रवेश | : २०, २१ आणि २३ ऑगस्ट, सकाळी १० ते दुपारी २ |
| कला, वाणिज्य, विज्ञान शाखांची तिसरी गुणवत्ता यादी | : २६ ऑगस्ट, सायंकाळी ५ वाजता |
| तिसऱ्या गुणवत्ता यादीचे प्रवेश | : २७, २८ ऑगस्ट, सकाळी १० ते दुपारी २ |
| रिक्त जागांची यादी | : ३१ ऑगस्ट |

## रेन वॉटर हार्वेस्टिंगसाठी
# 'स्वाभिमान' आक्रमक

### प्रकल्प न राबवणाऱ्या विकासकांवर कारवाईची मागणी

**मुंबई (प्रतिनिधी) :** मुंबईमध्ये एक हजार चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्रफळाच्या जागेत उभ्या राहणाऱ्या इमारतींमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंगची योजना राबवणे बंधनकारक असताना अनेक विकासकांनी ही योजना केवळ विकास आराखड्याच्या कागदांवरच ठेवली आहे. अशा ४२ विकासकांची नावेच तपशीलासह महापालिका आयुक्त स्वाधीन क्षत्रिय यांना गुरुवारी 'स्वाभिमान' संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नितेश राणे यांनी दिली. येत्या १५ दिवसांत या विकासकांवर तसेच त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी अन्यथा 'स्वाभिमान'चे कार्यकर्ते आयुक्तांना रस्त्यावर फिरू देणार नाहीत, असा सज्जड इशाराही त्यांनी क्षत्रिय यांना दिला.

'स्वाभिमान'ने या योजनेची अमलबजावणी होत नसल्याच्या महत्त्वाच्या बाबीकडे लक्ष वेधले आहे, असे सांगत क्षत्रिय यांनी सर्व प्रकरणांची पडताळणी करून त्यामध्ये विकासक व अधिकारी दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले.

मुंबईमध्ये २००७पासून ही योजना बंधनकारक करण्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये (डीसी रुल) तरतूद करण्यात आली आहे. ही योजना राबवणाऱ्या इमारतींनाच भोगवटा प्रमाणपत्र दिले जावे असा नियम आहे. मात्र काही विकासकांनी ही योजना कागदोपत्री दाखवून भोगवटा प्रमाणपत्रे (ओसी) मिळवली आहेत. पालिकेची तसेच जनतेची दिशाभूल करणाऱ्या अशा ४२ विकासकांची व इमारतींची नावेच पुराव्यासह 'स्वाभिमान'चे अध्यक्ष नितेश राणे यांनी महापालिका आयुक्त स्वाधीन क्षत्रिय यांना दिली.

ही योजना केवळ कागदावरच ठेवणाऱ्या ज्या इमारतींना ओसी दिली त्यांची जलखात्याच्या माध्यमातून पाहणी करण्यासाठी एक समिती स्थापन करावी, अशी मागणी त्यांनी केली. शांघाय, सिंगापूर, न्यू यॉर्क, लंडन यासारखी शहरे पावसाच्या पाण्यावर अवलंबून नसून त्यांनी पाण्याचे पर्यायी स्रोत निर्माण केले आहेत. पालिकेनेही रेन वॉटर हार्वेस्टिंग, समुद्राचे पाणी गोडे करणे तसेच सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्या पाण्याचा पुनर्वापर आदी योजना हाती घ्यायला हव्यात, असे नितेश राणे यांनी आयुक्तांना सुचवले.

### मुंबईत वर्षभर पाणीकपात?

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावांमधील पाण्याच्या पातळीमध्ये समाधानकारक वाढ न झाल्याने मुंबईकरांवर लागू केलेली १५ टक्के पाणीकपात एक महिन्यांनी वाढवण्यात येत असल्याची घोषणा महापालिका आयुक्त स्वाधीन क्षत्रिय यांनी केली आहे. मात्र ही पाणीकपात एक महिन्यांकरता वाढवण्यात आली असली तरी तलावांतील पाण्याचा साठा लक्षात घेता पाणीकपात मागे घेणे अशक्यच आहे. त्यामुळे टप्प्याटप्प्याने ही कपात जाहीर करत वर्षभर लागू करण्यात येणार असल्याचे माहितगारांकडून समजते.

पाणीकपातीला महिन्याची मुदतवाढ...३



### पाण्यासाठी पावसाळ्यातही लाठ्या खाऊ

**मुंबईत पाण्याचा प्रश्न गंभीर असून आयुक्तांना दिलेल्या पुराव्यानंतर ते कोणती कार्यवाही करतात याकडे आमची बारीक नजर आहे. त्यांनी कार्यवाही न केल्यास ३ डिसेंबरची पुनरावृत्ती घडवल्याशिवाय राहणार नाही. पाण्यासाठी आम्ही उन्हाळ्यात काठ्या खाल्या होत्या. आता पावसातही खाऊ. पण, पाण्याच्या मुद्द्यावर जनतेची फसवणूक खपवून घेणार नाही. पाण्याच्या मुद्द्यावरून सर्व राजकीय पक्षांनी एकत्र यायला हवे. मनसे व 'स्वाभिमान' एकत्र आल्यास मुंबईचा पाणीप्रश्न सुटणार असेल तर मी राज ठाकरे यांच्याबरोबर २४ तास बसायला तयार आहे.**

**नितेश राणे,** 'स्वाभिमान'चे अध्यक्ष



### आदिवासींच्या जमिनींना संरक्षण

**मुंबई (प्रतिनिधी) :** आदिवासींची फसवणूक करून त्यांच्या जमिनी कुणी बळकावू नयेत, या उद्देशाने महसूल जमीन संहिता (१९६६) आणि अनुसूचित जमातींना जमिनी हस्तांतरित करण्याविषयीच्या १९७४मधील अधिनियमात दुरुस्तीचे विधेयक विधानसभेने गुरुवारी संमत केले. या कायद्याच्या कडक अमलबजावणीसाठी कालबद्ध कार्यक्रम आखला जाईल, अशी घोषणा महसूलमंत्री नारायण राणे यांनी केली. आदिवासींच्या जमिनींची विक्री आणि अदलाबदलीबाबत १९७५मधील कायद्याची मुदत २००४मध्ये संपुष्टात आली होती. सुधारित कायदा पूर्वलक्षी प्रभावाने अमलात येईल, असे राणे यांनी सांगितले.

**सविस्तर बातमी...२**

# भाजपची कोलांटउडी

**मुंबई (प्रतिनिधी) :** भाजपने 'कर्नाटकातील मराठी भाषक प्रदेश केंद्रशासित नकोच', अशी कोलांटउडी मारत महाराष्ट्राच्या उरात खंजीर खुपसला आहे. कर्नाटकातील ८६५ गावांना केंद्रशासित प्रदेश करण्यास भाजपचा विरोध नाही, असे विधानसभेचे विरोधी पक्षनेते एकनाथ खडसे यांनी सांगितल्यावर काही तासांतच सपशेल पलटी घेतली. भाजप अध्यक्ष नितीन गडकरी गुरुवारी विधानभवनात आल्यानंतर खडसेंनी घूमजाव केले. त्यामुळे या पक्षाच्या राष्ट्रीय नेतृत्वानेच मराठी माणसाशी द्रोह केल्याची संतप्त भावना व्यक्त होत आहे.

'मराठी भाषक प्रदेशाला केंद्रशासित करावे', या भूमिकेवर मंगळवारी विधिमंडळात मतैक्य झाले होते. पण बुधवारी सर्वपक्षीय शिष्टमंडळाने पंतप्रधानांना सादर केलेल्या निवेदनात मात्र या मागणीचा उल्लेख नव्हता. भाजपच्या भूमिकेत आमूलाग्र बदल झाल्यामुळेच हा मुद्दा वगळण्यात आल्याचे माहीतगारांनी उघड केले होते.

### आता म्हणे, सीमाभाग केंद्रशासित नको

'पंतप्रधानांशी झालेल्या चर्चेत आम्ही केंद्रशासित प्रदेशाला विरोध केल्याचे वृत्त चुकीचे आहे', असा दावा खडसेंनी गुरुवारी विधानसभेत केला. 'कर्नाटकातील मराठी भाषक भाग केंद्राच्या हवाली करणे म्हणजे मराठी माणसांना लांडग्याच्या तावडीतून वाघाच्या तावडीत सोपवल्यासारखे होईल', असे ते म्हणाले. 'प्रतिज्ञापत्रावरून केंद्र सरकार महाराष्ट्रद्वेष्टे असल्याचे स्पष्ट झाले आहे. कानडी माणूस वीरप्पा मोइली केंद्रात न्यायमंत्री असताना महाराष्ट्राला न्याय कसा मिळेल', असा प्रतिप्रश्नही त्यांनी केला. मात्र ते प्रतिज्ञापत्र केंद्रीय न्याय मंत्रालयाचे नव्हे तर गृहमंत्रालयाचे असल्याचे खडसेंना माहीतच नसल्याचे उघड झाले. त्यामुळे, 'गृह खाते खटला लढवत असले तरी वकील न्याय खात्यानेच नेमले आहेत. मग ते गृहमंत्र्यांचे ऐकतील की न्यायमंत्र्यांचे', अशी कसरत करत त्यांनी मूळ मुद्द्याला बगल दिली.

'केंद्राच्या धोरणांवर आमचा विश्वासच नाही. केंद्रशासित झाल्यास सीमाभागातील मराठी भाषक प्रदेशाचे नियंत्रण केंद्राकडे जाईल. त्यामुळे मराठी माणसाचेच नुकसान होईल', असे अजब त्रैराशिक भाजपने मांडले. 'मराठी माणसावर काँग्रेसचे खरोखरच प्रेम असेल तर कर्नाटक काँग्रेसने मराठी भाषक भागाला केंद्रशासित प्रदेश करण्याच्या ठरावाला पाठिंबा देण्याचा अनाहूत सल्लाही भाजपने दिला आहे.

**न्यूज पेरली कुणी?...२**



# रुपयाची नवी ओळख

### मुंबईच्या डी. उदयकुमार यांनी घडवले रुपयाचे चिन्ह

**नवी दिल्ली :** 'जगात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था' असा लौकिक मिळवणाऱ्या देशाच्या रुपयाला गुरुवारी खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय ओळख मिळाली. माहिती आणि नभोवाणीमंत्री अंबिका सोनी यांनी पत्रकार परिषदेत भारतीय रुपयासाठी खास चिन्हाची घोषणा केली आणि अशी खास चिन्हांकित ओळख असलेल्या डॉलर, येन, पौंड आणि युरो यांच्या पंक्तीत रुपया जाऊन बसला. नव्या चिन्हाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

देवनागरी लिपीतील 'र' आणि रोमन लिपीतील 'आर' या अक्षरांची सांगड घालून रुपयाच्या नव्या चिन्हाचे डिझाइन करण्यात आले आहे. मुंबई आयआयटीत पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेले डी. उदयकुमार यांनी हे डिझाइन केले आहे. रुपयाला चिन्हांकित करण्यासाठी मार्च २००९मध्ये केंद्र सरकारने स्पर्धा घोषित केली होती. या स्पर्धेला चांगला प्रतिसाद मिळून २५ हजारांहून अधिक डिझाइन सरकारकडे आली. प्राथमिक फेरीत तीन हजारांहून अधिक डिझाइन निवडण्यात आली. अंतिम पाच डिझाइनमधून डी. उदयकुमार यांनी रेखाटलेले भारतीय रुपयाचे चिन्ह अव्वल ठरले.

'भारतीय चलनाला देशात आणि आंतरराष्ट्रीय मंचावर एकच चिन्ह मिळणे ही ऐतिहासिक घटना आहे,' असे अंबिका सोनी यांनी यावेळी सांगितले. 'या चिन्हामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेची खंबीर प्रतिमा निर्माण होईल आणि तिच्या वाढीचा वेगही अधोरेखित होईल. हे चिन्ह येत्या ६ महिन्यांत देशात सर्वत्र स्वीकारले जाईल. आंतरराष्ट्रीय स्तरावर हे चिन्ह स्वीकारण्यास १८ महिने ते २ वर्षे लागू शकतील, असेही सोनी यांनी सांगितले. रुपयाचे नवे चिन्ह नोटांवर आणि नाण्यांवर छापण्यात येणार नाही. मात्र त्याचा समावेश 'युनिकोड स्टॅंडर्ड'मध्ये करण्यात येणार आहे. यामुळे जगाच्या कुठल्याही भागात भारतीय रुपयाचे हे चिन्ह वापरणे सोयीचे होईल. सध्या स्वतःचे चिन्ह असणाऱ्या चलनांमध्ये केवळ पौंड स्टर्लिंगचे चिन्ह नोटांवर आणि नाण्यांवर छापले जाते.




**या आंतरराष्ट्रीय चलनांच्या मांदियाळीत भारतीय रुपयाही जाऊन बसला आहे.**

**रुपयासाठी आता एकच चिन्ह...९**





BRIGHT
ENGINEERING CLASSES
DEGREE & DIPLOMA
ALL SUBJECTS
ALL BRANCHES
SPECIAL BATCHES
FOR KT & DROPOUTS
AMIE★IETE★GATE
UPSC★MPSC★JTO★BARC★DRDO
9322420787
9320315510★9920155981




ACKRUTI CITY
LIFE TIME VALUE

प्रशस्त मोकळी जागा,
सभोवताली हिरवळ
. . . आणि तेही शहराच्या मध्यभागी !






ACKRUTI
GARDENIA
(Rosewood & Redwood)
२, २.५ व ३ बी.एच.के. फ्लॅट्स
मिरा रोड
जी.सी.सी. क्लबच्या मागे

आकृती सिध्दी – रॅप्टेकॉस कंपनीजवळ, थीरानी शाळेसमोर, वर्तक नगर, पोखरण रोड नं. १, ठाणे (प) – ४०० ६०६.
आकृती गार्डेनिया – शांतीवन, सिल्वर पार्क समोर, जी.सी.सी. क्लबच्या मागे, मिरा – भाईंदर रोड लगत, मीरा रोड, ठाणे – ४०१ ६०७.
आकृती कंट्रीवुडस् – कात्रज कोंढवा रोड लगत, सर्वे नं. ४५, तिळेकर नगर, पुणे – ४११ ०४८.

संपर्क : 67037500
sales@ackruticity.com | www.ackruticity.com